Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

# प्रगत अध्यापन शास्त्र आणि अध्यापन

**सौ. वसुधा समीर जोशी,**
**एम.फिल.(year 2013-15),**
**ॲड.विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक**

## 1.1 प्रगत अध्यापनशास्त्राची संकल्पना गरज महत्त्व :-

सकारात्मक ज्ञान आणि शहाणपणा विकसित करण्यासाठी दिले गेलेले शिक्षण म्हणजे प्रगत अध्यापनशास्त्र होय. शिक्षणाचा मुलभूत उद्देश एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञान देण्याचे कार्य करते. शिक्षणामुळे एखादया व्यक्तीची क्षमता आणि सुप्त प्रतिभाचे उदात्तीकरण होते. शिक्षणातून मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, संगणक विज्ञान, भाषाशास्त्र, समाजशास्त्र आणि मानववंशशास्त्र या विषयांचे सैध्दांतिक आणि उपयोजित ज्ञान मिळते. समाजातील सर्वच घटकातील व्यक्तीपर्यंत ज्ञान पोहचण्यासाठी आज शिक्षणक्षेत्रात विविध अध्यापनाच्या पध्दती विकसित झाल्या आहेत, अध्यापन पध्दतीचा जनक सॉक्रेटिस याने कुमारवयीन मुलांच्या अध्यापनाच्या आधुनिक पध्दती सांगितलेल्या आहेत.

### अ) अध्यापनशास्त्राच्या व्याख्या :-

Pedagogy ला सामान्यपणे अध्यापनाची पध्दती असे म्हणतात. अशी पध्दती की ज्यामध्ये अध्यापनाच्या पध्दती आणि कार्यवाहीचा समावेश या संकल्पनेनुसार सूचना शिक्षण आणि कृतीज्ञान आणि कौशल्य मिळवण्याच्या उद्देशाने अनुदेशीत केलेले उपक्रम आहे. अध्यापनशास्त्र हे शिक्षणाचे शास्त्र, कला आणि शिकविण्याचे सिध्दांत आहे.

### ब) शिक्षण आणि अध्यापनशास्त्र :-

अध्यापनशास्त्र हे अध्यापनाचे शास्त्र आणि कला आहे. अध्यापन हा एक महत्त्वपूर्ण व्यवसाय आहे. शिक्षणाचा एक भाग म्हणून शिक्षकांना नियमित प्रशिक्षण दिले जाते. अध्ययन आणि अनुदेशनाच्या माध्यमातून जे ज्ञान प्राप्त होते त्याला शिक्षण म्हणतात. आधुनिक अध्यापनशास्त्रात पियाजे यांच्या ज्ञानात्मक दृष्टिकोनाचा प्रभाव दिसून येतो. पियाजे आणि ब्रुनर या शास्त्रज्ञांच्या मते जेथे मानसिक

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

प्रक्रियेचा क्रमाने विकास साधला जातो. तेथे अध्यापनशास्त्राबाबतच्या कला, सराव, व्यवसाय इ. विकास हा होत जात असतो.

### 1.2 प्रगत अध्यापनशास्त्राची तत्त्वे :-

1) उच्च बौध्दिक कार्यासाठी संधी निर्माण करणे.
2) प्रत्येक विदयार्थ्यांचा सकारात्मक विकास करणे.
3) विदयार्थ्यांना सामाजिक दृष्टया सक्षम, बहुभाषी घडविण्यासाठी त्यांच्यातील आवश्यक कौशल्यांचा विकास करणे.

**प्रगत अध्यापन शास्त्राबाबतची वैशिष्टये :-**

1) प्रमाणित व अर्थपूर्ण भाषेचा वापर
2) वैविध्यपूर्ण अध्ययन
3) सहभाग व सहयोग करणे.
4) पूर्वज्ञान
5) भाषाशास्त्रातील कार्यपध्दतीचा मुशल वापर करणे.
6) पारदर्शी संघटन
7) शिक्षक सहभाग व विदयार्थ्यांची ग्रहणक्षमता
8) प्रमाणित मूल्यमापन

### 1.3 अध्यापनाच्या पायऱ्या :-

शिक्षकांची भूमिका म्हणजे विदयार्थ्यांना एकचित्त होऊन शिकवणे म्हणजेच अध्यापन करणे होय. अध्यापन करत असतांना शिक्षक जास्तीत जास्त अनुभव व भावनिक गुंतवणूक करुन अध्यापनाचे कार्य करतो त्यामुळे त्याचे विदयार्थ्यांशी विशिष्ट नाते विकसित होत असते. यामध्ये शिक्षकांनी अजून ही काही विशिष्ट उद्दिष्टे विदयार्थ्यांच्या प्रगतीसाठी डोळयासमोर ठेवणे आवश्यक आहे.

1) विदयार्थ्यांना अध्यापन प्रक्रियेत गुंतवून ठेवणे.
2) विदयार्थ्यांची बौध्दिक कार्यक्षमता विकसित करणे.
3) विदयार्थ्यांच्या यशासाठी प्रभावी प्रयत्न करणे.

4) उपचारात्मक अध्यापन करण्याऐवजी नैसर्गिक अध्यापनाव्दारे विदयार्थ्यांची क्षमता वाढविणे.

**अ) अध्यापनपूर्व कार्यक्षमता :-**

एक शिक्षक म्हणून विदयार्थ्यांच्या गरजा समजून घेऊन त्यानुसार त्यांना अध्यापन करणे आवश्यक आहे. बाहय परिस्थितीचे ज्ञान व वस्तुस्थितीचे ज्ञान ही दिले गेले पाहिजे. विविध प्रकारची जीवनकौशल्ये प्राप्त करण्यासाठी विदयार्थ्यांना कौशल्य प्रदान करणे ही महत्त्वाची भूमिका पार पाडणे आवश्यक आहे.

**अध्ययनपूर्व कार्यक्षमतेच्या पायऱ्या :-**

1. विदयार्थ्यांना जीवन जगण्यासाठी अत्यावश्यक प्राथमिक शैक्षणिक कौशल्यांची ओळख करुन देणे. उदा. अक्षर ओळख, गणितीय ज्ञान.
2. विदयार्थ्यांना सक्रिय मानव करण्यासाठी त्यांचा आत्मविश्वास उंचावण्यासाठी इतरांबरोबर चांगले संबंध आणि वैचारिक आंतरक्रिया होण्यासाठी भावनिक आणि सामाजिक कौशल्याची ओळख करुन देणे.
3. सर्वसाधारण हेतू निश्चित करणे - काहीध्येय निश्चित करणे जसे - श्रवण क्षमता विकसित होण्यासाठी जास्तीतजास्त चांगले व कृतियुक्त बोधप्रद विदयार्थ्यांला ऐकवणे.
4. विशिष्ट उद्दिदष्टांची निश्चिती करणे.
5. शैक्षणिक उद्‌देश साध्य करण्यासाठी घटक नियोजन करुन प्रत्येक लहान लहान कौशल्यावर प्रभुत्त्व संपादन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.
6. पाठ अध्यापनासाठी येथे आवश्यक आहे तेथे दृकसाधनांचा वापर करणे.
7. उपयुक्त अशी व्याख्याने, कृतिसत्रे, चर्चासत्रे, कृतीकार्यक्रम यांचे आयोजन करणे.
8. इतिहास विषयातील ज्ञानाचा उपयोग नैतिक, राजकीय मूल्य निश्चित करु शकतील अशा उद्‌देशाने विदयार्थ्यांना बाहय जगातील ज्ञान देणे.
9. विदयार्थ्यांत विशाल दृष्टिकोन निर्माण करणे. विदयार्थी केवळ परीक्षार्थी न बनता त्याला बाहय जगतातील वास्तविक जीवन जगण्यासाठी सक्षम करणे.
10. विदयार्थ्यांना स्वयंअध्ययनासाठी प्रेरीतकरुन त्यांना प्रयोग शिल व सर्जनशिल बनवणे त्यांच्यातील नवनिर्माणक्षमता विकसनासाठी त्यांना प्रोत्साहन देणे.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

**ब) अध्यापनांतर्गत कार्यक्षमता :-**

**अध्यापन धोरणे आणि पध्दती -**

विदयार्थ्यांची आकलन क्षमता त्यांच्या संस्कृतीनुसार व भाषेनुसार वाढेल यासाठी त्यांचा कृतीयुक्त जास्तीत जास्त सहभाग घेऊन संधी विदयार्थ्यांना देणे. विदयार्थ्यांना आपण कसे शिकवावे, कोणती पध्दती वापरावी, शिक्षकाचे सादरीकरण कसे असावे हे अध्यापनशास्त्र शिकवते.

विदयार्थ्यांना दैनंदिन जीवनातील उदा. अभ्यासक्रमाशी जोडून, सांगड घालून शिकवणे, कुशाग्र बुध्दिमत्तेच्या विदयार्थ्यांसाठी वेगळा वर्ग घेऊन शिकवणे यासाठी विदयार्थी व शिक्षकान मध्ये दोन प्रकारच्या आंतरक्रिया होणे आवश्यक आहे.

1. भावनिक आंतरक्रिया
2. विदयार्थी ओळख विदयार्थ्यांच्या जास्तीत जास्त समस्या सोडवण्यासाठी याचा उपयोग होईल.

**यासाठी पुढील प्रकार सांगितले आहेत.**

1. अर्थपूर्ण अध्यापनावर भर देणे.
2. शिक्षकांचे विविध भाषेवर प्रभुत्त्व असावे.
3. विदयार्थ्यांचे ज्ञान विस्तृत करण्यासाठी त्याच्या ज्ञानाचा वापर व्हावा.
4. लेखी भाषांना प्रोत्साहन दयावे.
5. भाषा विकासासाठी चित्राचा, बोलीभाषेचा उपयोग करावा. त्यासाठी सातत्यपूर्ण नियोजन करणे.

**विदयार्थी - विदयार्थी आंतरक्रिया -**

1. स्वयं अध्ययनाच्यावेळी संवाद साधणे - जेव्हा विदयार्थी एखादया घटकावर स्वयंअध्ययन करतात. त्यावेळी ते चूकिच्या मार्गानी जात नाही ना हे पाहून त्यांच्या शंकेचे निरसन करुन त्यांना चर्चेसाठी प्रोत्साहीत करणे.
2. सतत येणाऱ्या समस्येवर कायमस्वरुपी योग्य असे एखादे उत्तर देणे.
3. विदयार्थ्यांना त्यांच्या विचारांचे वर्णन व कथन करण्याची संधी देणे.

4. विदयार्थी आंतरक्रियेमूळे त्यांच्या समस्येचे निरसन होऊन एकाच प्रश्नाची अनेक उत्तरे मिळण्यास मदत होते. त्यामुळे त्यांच्या ज्ञानात भर पडते.
5. विदयार्थ्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी व त्यांचा विकास होण्यासाठी विदयार्थी आंतरक्रिया महत्त्वपूर्ण असते. अध्यापनाचा एकच विशिष्ट प्रकार न राबविता वैविध्यपूर्ण अध्यापन केल्यास विदयार्थी आपली अध्ययन क्षमता व वैचारिक पातळी वाढवित असतो.

**क) अध्यापनेत्तर कार्यक्षमता :-**

अध्यापनाचे कार्य संपल्यावर आपण शिकवलेले विदयार्थ्यांना कितपत आत्मसात झाले विदयार्थ्यांना काय आकलन झाले नाही त्यांच्या काय समस्या आहेत यासाठी विविध प्रकारे विदयार्थ्यांचे मूल्यमापन करणे आवश्यक असते. त्यापैकी काही मूल्यमापनाचे प्रकार पुढील प्रमाणे -

**मूल्यमापनाचे प्रकार -**

1. संतुलित विकास चाचणी - यामध्ये सामान्यातल्या सामान्य विदयार्थ्यांचा विचार करुन त्याप्रमाणे बौध्दिक क्षमतेची चाचणी शिक्षकांनी तयार करणे.
2. प्रमाणित चाचणी - प्रमाणित चाचणीचा पर्यायी आवश्यकता असेल तरच विचार करावा. याचा वापर फक्त बुध्दिमान विदयार्थ्यांची ज्ञान पातळी तपासण्यासाठी करावा.
3. ज्ञानाचे सादरीकरण - विदयार्थ्याने आत्मसात केलेल्या ज्ञानाचा विदयार्थी सादरीकरण करण्यासाठी कसा उपयोग करतो. शिकवलेल्या पाठातून नक्की काय उद्‌दिष्ट, हेतू सांगू शकतो का? जर विदयार्थी समजून सुध्दा सादर करु शकत नसेल तर त्याच्यात सादरीकरणाची क्षमता वाढवून त्याला बोलते करणे.
4. विदयार्थ्यांना अधिक कार्यप्रवण करण्यासाठी बक्षिसे देणे - विदयार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी त्यांच्या यशानुसार प्राविण्यानुसार कमी-अधिक किंमतीचे देणे व त्यामुळे त्याला अधिक अध्ययनास प्रवृत्त करणे.
5. अपयश ही यशाची पायरी असणे - नापास विदयार्थ्यास तुला अधिक ज्ञान मिळवण्याची संधी मिळाली आहे हे पटवून त्याला त्याच्या अपयशाची जाणिव न होऊ देता पुढे अधिक अभ्यास

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

करण्यास प्रोत्साहित करणे.

6. विदयार्थ्याला आत्मनिर्भर बनविणे - विदयार्थ्यांच्या स्वतःच्या क्षमतेवर अध्ययन करण्यास त्यांना प्रवृत्तकरुन स्वयंअध्ययन करण्याची उत्तम सवय लावून आत्मनिर्भर करते.
7. विदयार्थ्यांचे प्रयत्न ओळखून त्यांच्याबद्दल आदरयुक्तभावना ठेवणे - विदयार्थ्यांच्या लहान - सहान प्रयत्नांना प्रोत्साहन देऊन प्रगतीपथाकडे नेण्यास प्रवृत्त करा. शाबासकी दया, त्याच्यातील विचारांचा, विश्वासाचा व भावनांचा आदर करा. भेदभाव न करता त्याला आदरयुक्त वागणूक दिलीतर तो समाजतील प्रत्येक व्यक्तीला आदर दयायला शिकले.
8. विदयार्थ्यांच्या स्वतःच्या व पालकांच्या प्रतिक्रिया घ्या - विदयार्थ्यांना अध्यापनानंतर शिकवलेल्या भागावर किमान अभिप्राय विचारा त्याचप्रमाणे पालकांची सभा घेऊन पाल्याची प्रगती विचारा. पालकांच्या प्रतिक्रिया घेऊन शिक्षक आपले स्वतःचे मूल्यमापन करुन विदयार्थ्यांना न समजलेल्या भागाची परत उजळणी घेऊ शकतात.
9. मुख्याध्यापकांची प्रतिक्रिया घेणे - आपले अध्यापन किती योग्य झाले आहे किंवा नाही यासाठी वेळोवेळी मुख्याध्यापकांकडून प्रतिक्रिया घेणे. मुख्याध्यापक शिक्षकांचे मूल्यमापन करुन त्यांच्या अध्यापनाच्या सकारात्मक व सुधारात्मक बाजू सांगू शकतात.
10. अध्यापनाची नवनवीन कौशल्य अजमावणे - आजच्या पीढीसाठी आपले अध्यापन कितपत योग्य आहे की त्यासाठी अजून काही नाविन्ययुक्त पध्दती वापरावी याची पडताळणी शिक्षकांनी वारंवार करणे आवश्यक आहे. शासन व विदयापीठाकडून राबविल्या जाणाऱ्या उजळणी वर्ग, उद्बोधन वर्ग, चर्चासत्र यासाठी हजर राहून नविन कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे.

**समारोप**

आज ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. अदययावत ज्ञानात्मक घडामोडींना सामोरे जाणारा व प्रत्यक्ष जीवन पध्दतीत यशस्वी होणारा विदयार्थी घडवायचा असेल तर त्याचे विविध प्रकारांनी विविध घटनातून, प्रसंगातून, प्रत्यक्ष अनुभवातून, सुयोग्य मार्गदर्शन व समुपदेशातून मूल्यमापन केले गेले पाहिजे.

शाळेतील अभ्यासक्रम हा महत्त्वाचा घटक आहे या अभ्यासक्रमातून विदयार्थ्यांच्या आचार विचारांवर अनुकूल असे संस्कार घडवून समाज परिवर्तन करणे ही जबाबदारी ओळखून शिक्षकांनी नवनवीन कौशल्य आत्मसात करुन विदयार्थी घडवण्याचे आव्हान स्विकारले पाहिजे.